सत्यमेव जयते	**महाराष्ट्र शासन** **आरोग्य सेवा, आयुक्तालय, पुणे कार्यालय**		
संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु , नोंदणी, महाराष्ट्र राज्य, पुणे	२६१२२२५६ (वै) २६१२२५०८ (का)	संचालक, आरोग्य सेवा , आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत पुणे ४११००१ **ईमेल - :** dhspune१@gmail.com, crslegalcell@gmail.com	
आरोग्य सेवा **परिपत्रक**		जा क्र -संआसे /मुनिजमृ/ कक्ष ८३ / परिपत्रक / जन्म मृत्यु नोंदणी / ६८०७-९५३ /२६ दिनांक - १८ /०६ /२०२६	

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी

तथा जिल्हा निबंधक जन्म व मृत्यु जि .प...... (सर्व)

विषय : जन्म मृत्यु नोंदणी करताना अधिनियम व नियमातील कायदेशीर तरतुदीबाबत प्रमाणित कार्यपद्धती (SOP) मार्गदर्शक सूचना.

संदर्भ:

१) केंद्रशासनाचा जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९

२) महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २०००

३) मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाचे पत्र क्र.१/२/२००८ — VS (CRS) दि. २२/०८/२०१२

४) मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाचे पत्र क्र.१/१२/२०१४ — VS (CRS) दि. २९/१२/२०१४

५) मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाचे पत्र क्र.१/१२/२०१४ — VS (CRS) दि. २७/०७/२०१५

६) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र. ४३७/२०१६ दि.१२/०१/२०१६

७) ग्रामविकास व जलसंधारण विभाग या कार्यालयाचे पत्र क्र. संग्राम २०१५ / प्र. क्र. ९०/ संग्राम कक्ष दि. ११/०२/२०१६

८) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, परिपत्रक संकीर्ण -२०१६ / प्र. क्र. ४६ / नवि २० दि. १२/०२/२०१६

९) सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन अधिसूचना दि. १२/०४/२०१८

१०) नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन या कार्यालयाचे पत्र क्र. संकीर्ण २०१६ प्र. क्र. ४६ / न.वि २० दि. २८/०८/२०१८

११) अधिसूचना भारत सरकार दि. ११/०८/२०२३

१२) मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाचे पत्र क्र.१/१२/२०१८ — VS (CRS) दि. १२/०६/२०२५

१३) या कार्यालयाचे पत्र क्र.आ.मा.जि.आ/कक्ष ८१ /ना.नो.प /ज.मृ.नोंदणी Advisory/१३९१९ -५८ /२०२५ दिनांक.४/११/२०२५

१४) मा. मुख्य निबंधक, जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य या कार्यालयाचे पत्र क्र. संआसे / कक्ष ८१ ना.नों.प. / ज.मृ.नोंदणी Advisory / १५४६३-५०३ /२०२५ दिनांक ३०.१२.२०२५

१५) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.आ.मा.जि.आ/कक्ष ८३ /कायदा विभाग / न. क्र. ३५ / दुरुस्ती संदर्भात मार्गदर्शन /४०३७ — ४१०८ /२०२६ दि. ३०/०३/२०२६

१६) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. आ.मा.जि.आ/कक्ष ८१ /ना.नो.प /ज.मृ.नोंदणी/ CRS Advisory / ४५३०-४६०७ /२०२६ दिनांक.२०/०४/२०२६

१७) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.आ.मा.जि.आ/कक्ष ८३ /कायदा विभाग /२०२६ /५५ / ज.मृ. अभिलेख /५०७७-१५२ /२०२६ दि. २९ /०४/२०२६

१८) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.आ.मा.जि.आ/कक्ष ८३ /अभिलेख पुनर्निर्मिती/ न. क्र. ६२ /५६४०-४४/ २०२६ दि. १४ /०५/२०२६

१९) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. आ.मा.जि.आ/कक्ष ८१ /ना.नो.प /ज.मृ.नोंदणी/CRS Portal/ Registrar profile update/ ५९९६ — ६०३६ /२०२६ दिनांक.२६/०५/२०२६

२०) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. आ.मा.जि.आ/कक्ष ८१ /ना.नो.प /ज.मृ.नोंदणी/Frequent Review/ ६०३७-१४६ /२०२६ दिनांक.२७/०५/२०२६

२१) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.आ.मा.जि.आ/कक्ष ८१ /ना.नो.प /ज.मृ.नोंदणी/Digitized Events/६६०९-४८ /२०२६ दिनांक.११/०६/२०२६

केंद्र शासनाचा जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नियम २००० नुसार महाराष्ट्र राज्यात जन्म मृत्यु घटनांची नोंदणी करण्यात येते. भारत सरकार यांनी जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम (सुधारित) २०२३ संपुर्ण देशात लागु केला आहे. जन्म मृत्यु नोंदणी करण्याकरीता CRS पोर्टल सुरु करण्यापूर्वी राज्यात निबंधकामार्फत हस्तलिखीत किवा इतर संगणक प्रणाली मधून नोंदणी करुन प्रमाणपत्र अदा करण्यात येत होती. शहरी भागात विविध महानगरपालिका व नगर पालिका यांचेकडुन त्यांचेस्तरावरील तयार करण्यात आलेल्या संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत होता.

तथापि दि २७.०७.२०१५ रोजीच्या पत्रानुसार केंद्र शासनाकडुन सर्व राज्यांसाठी जन्म मृत्यु नोंदणी करीता dc.crsorgi.gov.in ही एकच संगणक प्रणाली विकसित करण्यात आली. महाराष्ट्र राज्यात सदर संगणक प्रणाली दि १.१.२०१६ पासुन शहरी व ग्रामीण भागात कार्यान्वीत करण्यात आली आहे. राज्यातील सर्व निबंधकानी सदर नागरी नोंदणी प्रणाली (CRS पोर्टल) चाच वापर करण्याबाबत केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी सुचना दिलेल्या आहेत. मा. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी दि. १२/०१/२०१६ रोजी मा. सचिव, नगरविकास विभाग यांना सुद्धा सदर संगणक प्रणालीचा वापर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच राज्यातील सर्व शासकिय आरोग्य संस्था प्रमुख यांना सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, अधिसुचना दि

१२.०४.२०१८ नुसार रुग्णालयात घडणा-या घटनांकरीता निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे. शासकिय रुग्णालय इमारत व रुग्णालयीन परिसरातील क्षेत्रात घडणा–या जन्म, मृत्यु व उपजत मृत्यु घटनांची निबंधक म्हणुन नोंदणी करणे बंधनकारक आहे. केंद्र शासनाच्या दि. १२.०६.२०२५ च्या परिपत्रकानुसार शासकिय आरोग्य संस्थामध्ये जन्म झाल्यानंतर घटनांची संगणक प्रणालीवर नोंद घेऊन मातेला घरी सोडण्यापुर्वी बाळाचे जन्म प्रमाणपत्र देण्यात यावे असे कळविण्यात आलेले आहे. शासकीय आरोग्य संस्था प्रमुख हे स्वतः माहिती देणारे व निबंधक, जन्म व मृत्यू असल्याने केंद्रशासनाच्या उपरोक्त परिपत्रकातील तरतुदींचे तंतोतंत पालन करावे. राज्यात जन्म मृत्यु नोंदणी कायदेशीर तरतुदीनुसार व्हावी यासाठी केंद्र शासनाचा जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व निबंधक यांना वेळोवेळी नियमित सुचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक यांची कर्तव्ये व जबाबदारी :

राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांची जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ६ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने जिल्हा निबंधक, जन्म मृत्यु म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म मृत्यू हे जिल्ह्यात अधिनियम व नियमातील आणि मुख्य निबंधकांच्या सुचनानुसार व आदेशानुसार नागरी नोंदणी पध्दतीच्या जन्म मृत्यु नोंदणीची अमंलबजावणी करण्यास जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम ६ पोटकलम (२) नुसार सर्वस्वी जबाबदार आहेत. जिल्ह्यातील निबंधकांचे पर्यवेक्षण करणे आणि त्यांच्या कार्यालयात ठेवलेल्या नोंदवह्यांची तपासणी करणे, निबंधकाकडील सर्व नोंदवह्या व्यवस्थित रित्या सांभाळून ठेवल्या जातील याची अंमलबजावणी करणे , ठराविक कालावधीनंतर जिल्ह्यातील सर्व जन्म मृत्यू नोंदणी निबंधकांना व नवनियुक्त निबंधकांना नियमित प्रशिक्षण देणे, निबंधकाकडुन राज्याच्या मुख्य कार्यालयात आवश्यक ती माहिती व मासिक अहवाल विहित कालावधीत सादर करावीत. जिल्ह्यातील जन्म मृत्यु नोंदणी बाबतच्या अडचणीच्या मुद्द्यांचे नागरी नोंदणी बाबत गठीत जिल्हा समन्वय समिती सभेमध्ये मा. जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार निराकरण करावे. तसेच गाव पातळीवर व तालुका पातळीवरील समन्वय समित्या यांच्या बैठका नियमित होणेस संनियंत्रण व पर्यवेक्षण करावे.

२) अपर जिल्हा जिल्हा निबंधक (पंचायत) यांची जबाबदारी :

राज्य शासनाने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व गटविकास अधिकारी , पंचायत समिती यांची अपर जिल्हा निबंधक, जन्म मृत्यु, म्हणुन नियुक्ती केलेली आहे. मुख्य निबंधकांच्या व जिल्हा निबंधकाच्या सुचनेनुसार जन्म मृत्यु नोंदणीच्या कामावर देखरेख ठेवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), गटविकास अधिकारी तथा अपर जिल्हा निबंधक यांनी आपल्या नियमित सभा / बैठकांमध्ये नागरी नोंदणी पध्दतीचा आढावा घ्यावा. गाव पातळीवर ग्रामपंचायत अधिकारी हे जन्म मृत्यू कायद्यानुसार नोंदणी करत आहेत का याबाबत नियमित संनियंत्रण आणि पर्यवेक्षण करावे. तालुका स्तरावरील सर्व अपर जिल्हा निबंधक तथा गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी यांचे प्रशिक्षण जिल्हा निबंधक यांचे मार्फत किंवा प्रशिक्षकां मार्फत नियमित घेण्यात यावे. ग्रामपंचायत अधिकारी यांचे मासिक अहवाल नमुना क्र. ११ , १२, १३ एकत्र करून जिल्हा निबंधक यांना देण्यात यावेत. जुन्या जन्म नोंदी ची नोंद पोर्टल मध्ये घेताना अचूक नोंद घेण्यात यावी. तसेच सर्व ग्रामपंचायत अधिकारी हे नागरी नोंदणी प्रणालीचाच वापर करतील याबाबत सूचना देऊन अंमलबजावणी करावी.

३) निबंधक जन्म मृत्यू यांची कर्तव्ये व जबाबदारी:

जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ७ मधील तरतुदीनुसार राज्यातील विविध कार्यक्षेत्रात राज्य शासनाने निबंधकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सर्व निबंधकानी जन्म मृत्यु नोंदणी करण्यापुर्वी सदर घटना आपल्याच कार्यक्षेत्रातच (ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, प्राआकेंद्र ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, cantonment दवाखाना इमारत इत्यादी) घडली असल्याची खात्री करावी. आपल्या कार्यक्षेत्रातील १०० टक्के घटनांची नोंद होईल याची खबरदारी घ्यावी. सर्व निबंधकांनी जन्म मृत्यु नोंदणी करीता केंद्र शासनाने विकसित केलेली संगणक प्रणालीच वापरण्यात यावी.जन्म मृत्यु नोंदणी करीता वापण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीचा लॉगीन व पासवर्ड इतरांना देण्यात येऊ नये जन्म मृत्यु नोंदणी करताना अधिनियम व नियमातील कायदेशीर तरतुदीनुसारच करण्यात यावी.

सर्व निबंधकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व जन्म मृत्यु घटनांची नोंदणी विहित वेळेत करणे बंधनकारक आहे. यासाठी निबंधकानी आवश्यक उपाय योजना कराव्यात जेणे करुन नागरी नोंदणीचे कामकाज सुलभ होऊन नागरीकांना जन्म मृत्यु नोंदणीची सेवा देता येईल. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार कलम ८ व ९ मधील नमुद माहिती देणा-या व्यक्तीने जन्म मृत्यु व उपजत मृत्यू घटनेची माहिती नियम ५ नुसार घटना घडल्यापासुन २१ दिवसाच्या आत निबंधकास देणे बंधनकारक आहे. कलम १२ नुसार निबंधकानी ७ दिवसाच्या आत जन्म मृत्यु घटनांची नोंदणी पुर्ण करुन कलम ८ व ९ मधील तरतुदींनुसार ज्या व्यक्तीने माहिती दिलेली असेल त्यांना विहित नमुन्यातील प्रमाणपत्र विनामुल्य दयावे. जन्म अथवा मृत्यु घटनेची माहिती विहीत केलेल्या जबाबदार व्यक्तींनी (कलम ८ व ९) २१ दिवसाच्या आत न दिल्यास सदर प्रकरणी उशिरा नोंदणी बाबतची प्रक्रिया अवलंबिण्यात यावी.

४) उशिराच्या नोंदणी बाबत सूचना

कलम १३(१) नुसार निर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर, परंतु तीस दिवसांच्या आत निबंधकांना माहिती देण्यात आलेल्या कोणत्याही जन्म किंवा मृत्यूची नोंदणी विलंब शुल्क भरून केली जाईल. कलम १३ (२) नुसार ज्या जन्म किंवा मृत्यूची माहिती तीस दिवसांनंतर परंतु ती घडल्यापासून एक वर्षाच्या आत निबंधकांना उशिरा देण्यात आली असेल, ती नोंदणी जिल्हा निबंधक, किंवा या संदर्भात विहित केलेल्या अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीने आणि विलंब शुल्क भरून आणि इलेक्ट्रॉनिक किंवा अन्य प्रकारे, विहीत नमुना क्रमांक-१४ (स्वयं घोषणापत्र) मध्ये स्वयं-प्रमाणित दस्तऐवज सादर केल्यानंतरच केली जाईल. कलम १३(३) नुसार ज्या जन्म किंवा मृत्युची माहिती निबंधकांना देण्यास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असेल तर, अशी नोंदणी, जन्म किंवा मृत्यु ज्या क्षेत्रामध्ये झाला आहे त्या क्षेत्राचे अधिकार क्षेत्र ज्यांच्याकडे आहे, अशा केवळ जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या कार्यकारी दंडाधिकारी यांच्या लेखी परवानगीने आणि विलंब शुल्क भरून केली जाईल. निबंधकांनी कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यु नोंद नसल्याचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यापुर्वी सदर जन्म घटना आपल्याच निबंधक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात घडली असल्याचा सबळ पुरावा घ्यावा व तद्नंतर अनुपलब्धता प्रमाणपत्र द्यावे.

५) **अनुपलब्धता प्रमाणपत्र बाबत सूचना**

जन्म दवाखान्यात घडला असल्यास दवाखान्यातील कागदपत्रे (डिसचार्ज कार्ड, प्रसुती नोंदवहीतील नोंद, बाळाचे अथवा मातेचे लसीकरण कार्ड,) जन्म घरी झालेला असल्यास आंगणवाडी सेवीका, गरोदर मातेची नोंद करणारी आरोग्य सेविका/सेवक, प्रसुती करणारी प्रशिक्षित दाई, आशा सेविका इतर समान कर्मचारी जसे की पोलिस पाटील / तलाठी या कर्मचाऱ्यांच्या जवाब किंवा प्रतिज्ञापत्राची पडताळणी करूनच निर्णय घ्यावा. मृत्यु घरी झालेला असल्यास अंत्यसंस्कार बाबतची कागदपत्रे (स्मशान/दफन पास), मृत्यु समयीचे उपस्थित दोन जवळचे नातेवाईक शपथ पत्र, पोलिस पाटील / तलाठी या कर्मचाऱ्यांच्या जवाब किंवा प्रतिज्ञापत्राची पडताळणी करूनच निर्णय घ्यावा. मृत्यु दवाखान्यात घडला असल्यास दवाखान्यातील कागदपत्रे (मृत्युच्या कारणांचे वैदयकिय प्रमाणिकरण प्रमाणपत्र, शवच्छेदन अहवाल,) निबंधकांनी प्रदान केलेल्या कागदपत्रांची संभाव्य फसवणूक किंवा अवैधतेसाठी काळजीपूर्वक तपासणी करावी. जन्म अथवा घटनेचा एक पुराव्यावरुन निबंधकाची खात्री न पटल्यास निबंधकानी अन्य पुरावे घेऊन पडताळणी करुन याबाबतची कार्यवाही करावी. समाधान होत नसेल तर आवश्यकतेनुसार पोलिस विभागाची मदत घेण्यात यावी. आपल्या कार्यक्षेत्रात घटना घडल्याबाबत कोणत्याही पुराव्यानुसार निबधकास खात्री न पटल्यास अनुप्लब्धता प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. निबंधकाची पुर्ण खात्री झाल्यावर निबंधकाने नमुना क्रमांक १० मध्ये अनुप्लब्धता प्रमाणपत्र द्यावे. या करिता दि.१२.०३.२०२५ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

६) **नोंदवह्यांचे जतन**

जन्म मृत्यु नोंदणी करिता अधिनियमातील कलम ८ व नियम ५ नुसार जन्म नोंदणी करीता नमुना १, मृत्यु नोंदणी करीता नमुना २ व उपजत मृत्यु नोंदणी करीता नमुना ३ माहिती देणा-याने भरणे बंधनकारक आहे. नमुना क्र. १ , २ , ३ वर कलम ११ नुसार माहिती देणाराची स्वाक्षरी/अंगठा असणे बंधनकारक आहे. सदर माहिती देणारी व्यक्ती यांनी अहवाल नमुन्यातील सर्व माहिती विशेषतः नाव, पत्ता , आईचे नाव, वडिलांचे नाव ही माहिती अचूक भरावी. निबधकांनी नोंदणी करीता जन्म, मृत्यु अथवा उपजत मृत्यु याबाबतचा नमुना प्राप्त झाल्यानंतर सदर घटना आपल्याच कार्यक्षेत्रात

झाली असल्याची खात्री करावी. तसेच अहवाल नमुन्यातील सर्व रकाने भरले आहेत याची खात्री करावी. अहवालातील सर्व माहिती संगणक प्रणालीवर भरुन नोंदणी करावी. सोबत विहित नमुना अहवाल व घटनेबाबतचे आवश्यक कागदपत्र संगणक प्रणालीवर अपलोड करावी. संगणक प्रणालीवर तयार झालेला नोंदणी क्रमांक अहवाल नमुन्यातील नोंदणी क्रमांक रकान्यात लिहावा. तसेच नोंदणी दिनांक लिहुन निबंधकांनी स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. निबंधकाव्यतिरिक्त इतरांनी स्वाक्षरी करु नये. नोंदणी प्रक्रियेनंतरच दोन भाषांमधीलच जन्म अथवा मृत्युचे प्रमाणपत्र वितरित करण्यात यावे. जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम (सुधारित) २०२३ कलम १२ निबंधकांनी जन्म मृत्युची नोंदणी ७ दिवसाच्या आत कोणतीही फी न अकारता संगणक प्रणालीवर नोंदविणे बंधनकारक आहे. प्रथम प्रत दिलेल्या तारखेची अभिलेखात नोद घेण्यात यावी. जन्म मृत्यु आणि उपजत मृत्युच्या माहितीमधील कायदेशीर तपशीलाचे नमुने एका स्वतंत्र फोल्डरमध्ये क्रमाने ठेवा. हे नमुने म्हणजेच जन्म नोंदणी नोंदवही, मृत्यु नोंदणी नोंदवही व उपजत मृत्यु नोंदवही अनुक्रमे नमुना क्र ७, ८ व ९ म्हणुन संबोधण्यात येईल. जन्म , उपजत मृत्यु , मृत्यु नोंदवही व नोंदणीशी निगडित सर्व दस्तावेज कायम स्वरुपी जतन करण्यात यावेत. नोंदवहया सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी सक्षम अधिकारी /कर्मचारी यांच्याकडे देण्यात यावी. नोंदवहया अथवा त्यातील पाने गहाळ होणार नाहीत याची काळजी घ्यावी. जन्म उपजत मृत्यु , मृत्यु नोंदवही व नोंदणीशी निगडित (उशिरा नोंदणी बाबतचे आदेश,नोदणी बाबतचे विविध अर्ज, त्याअनुसरून पुराव्या दाखल दस्तावेज) सर्व दस्तावेज कायम स्वरुपी जतन करण्यात यावेत. जुने जन्म मृत्युचे अभिलेख जिर्ण होऊन फाटण्याची शक्यता आहे तरी ते स्कॅन करण्यात यावेत. आपल्याकडे नोंदीबाबतचा मुळ नोंदवही /अभिलेख उपलब्ध असल्यावरच जन्म अथवा मृत्यु प्रमाणपत्र वितरित करण्यात यावेत.

७) जन्म / मृत्यू नोंदीमधील दुरुस्ती

जन्म आणि मृत्यु नोंदणी करण्यात आल्यानंतर नोंदणीमधील विविध माहिती बद्दल, दुरुस्ती करण्याबाबतची मागणी नागरिक तसेच निबंधक यांच्याकडुन करण्यात येते. जन्म अथवा मृत्यु नोंदणीवहीतील दुरुस्ती करण्याकरीता जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९, च्या कलम १५ मध्ये तसेच महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २०००, नियम ११ मध्ये याबाबत स्पष्ट कायेदशीर

तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदींचा वापर करुन निबंधकाने याबाबत कार्यवाही करणे गरजेचे आहे. जर निबंधकांना खात्री पटली की, नोंदवहीतील कोणतीही नोंद प्रारूप किंवा आशय याद्दष्टीने चुकीची आहे किंवा फसव्या / अयोग्यरीतीने केली गेली आहे, तर राज्यशासनाच्या नियमांनुसार निबंधक कार्यवाही करू शकतात. जन्म किंवा मृत्युच्या नोंदीवही मधील दुरुस्ती बाबत निबंधकांनी संबधिताकडुन याबाबतचा लिखीत स्वरुपातील अर्ज घेण्यात यावा. निबंधकानी माहिती देण्या-या व्यक्तीने नोंदणी करीता देण्यात आलेली मुळ अभिलेखातील माहिती जन्म नोंदवही (नमुना क्र ७) अथवा मृत्यु नोंदवही (नमुना क्रमांक ८) तपासावी /तुलना करावी. जर नोंदणीमध्ये सामान्य लेखनचुक (नावांच्या स्पेलिंग, अक्षरामधील काना मात्रा वेलांटी, उकार अशी लेखन प्रमादामध्ये अथवा औपचारिक) झाली असल्यास याबाबत कागदपत्रांची पडताळणी करुन खात्री करुन /समाधान झाल्यावरच त्याप्रमाणे निबंधकानी दुरुस्ती करावी. सदर दुरुस्ती करताना जन्म नोंदवही (नमुना क्र ७) अथवा मृत्यु नोंदवही (नमुना क्रमांक ८) मुळ नोंदणीत कोणताही बदल न करता समासात / शेरा रकान्यात दुरुस्ती नोंदवून दिनांक लिहून निबधकाने स्वाक्षरी करावी.

निबंधकाने नोंदवहीत दुरुस्ती ज्या कागपदत्रांची पडताळणी करुन केलेली आहे अशी सर्व कागदपत्रे ही नोंदवहीचा भाग असतील, ती नोंदवहीसोबत कायम स्वरुपी जतन करण्यात यावीत. तसेच दुरुस्तीसंदर्भात माहिती देणाऱ्याची स्वाक्षरी घेण्यात यावी. जर एखादी नोंद सारत: चुकीची आहे, असे जर एखादी व्यक्ती खात्रीने सांगत असेल तर निबंधकांनी, त्या चुकीचे स्वरुप आणि प्रकरणातील खरी माहिती असलेल्या दोन विश्‍वसनीय व्यक्तीनी दिलेली प्रकरणाची सत्यस्थिती बाबतचे प्रतिज्ञापत्र सादर केल्यावर व इतर कागदपत्रे तपासून खात्री करुन कलम १५ नुसार नोंदीची दुरुस्ती करेल. मुलाच्या जन्माच्या नोंदणी नंतर आई वडिलांनी त्याच्या नावात बदल केला आणि तो गॅझेटमध्ये प्रसिध्द झाला तर त्यानुसार त्याचा नावाचा समावेश नोंदवहीत करण्याबाबतची बाब कलम १५ मध्ये अंतर्भत करण्यात आलेली नाही त्यामुळे नावातील बदलाचा जन्म नोंदवहीत समावेश करण्याची गरज नाही. मुलाच्या जन्माच्या नोंदणी नंतर आई वडिलांचा घटस्फोट झाल्यास वडीलाचे नाव काढुन फक्त आईचे नाव ठेवण्याबाबत मागणी करण्यात येते. जन्म नोंदणी / जन्म प्रमाणपत्र ही त्या तारखेस असणारी स्थिती आहे. सबब वडिलांचे नाव जन्म नोंदवही मधून वगळण्यात येत नाही. जन्म अथवा मृत्युप्रमाणपत्रावर असलेल्या राहत्या घराचा पत्ता व कायमचा पत्ता हे घडलेल्या

घटनेच्यावेळी असणाऱ्या स्थितीशी निगडीत आहेत. पुढीलकाळात सदर पत्यात बदल झाल्यास त्याप्रमाणे प्रमाणपत्रात बदल करण्याची तरतूद अधिनियम व नियमात नाही. निबंधकांनी कलम १५ व नियम ११ नुसार करण्यात आलेल्या नोंदणीमधील प्रत्येक दुरुस्तीची माहिती आवश्यक तपशीलासह नियमित उपमुख्य निंबधक , जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य यांना कळवावी. जुन्या नोंदी CRS पोर्टलवर घेताना जशाच्या तशा मूळ नोंदी प्रमाणे घेण्यात याव्यात. व त्यानंतर एखादया नोंदी मध्ये आवश्यकता असेल तर, त्यांचा अर्ज घ्यावा, शपथपत्र घ्यावे व सर्व कागदपत्रे तपासून खात्री करून व गरज भासल्यास चौकशी करूनच किरकोळ दुरुस्ती करावी व नियम ११ (५) नुसार कार्यवाही करावी. दुरुस्ती करताना अवैध दुरुस्ती केली असेल तर ती रद्द करावी लागणार व त्यांची मूळ नोंद कायम ठेवून दुरुस्ती केलेले प्रमाणपत्र परत घेण्यात यावे.

८) नोंद रद्द करणे

एखादी जन्म अथवा मृत्यू नोंद कपटाने किंवा अयोग्यरीतीने केली असल्यास नोंद रद्द करणेबाबत कार्यवाही करावी . अर्जदार / तक्रारदार यांचे लेखी म्हणणे घ्यावे. रद्द करण्याची खात्री झाल्यास सर्व कागदपत्रांसह व स्वयंस्पष्ट अभिप्रायासहित प्रस्ताव जिल्हा निबंधक कार्यालयास पाठवावा. जिल्हा निबंधक कार्यालयाने प्रस्ताव तपासून, आवश्यकतेनुसार सविस्तर चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव मा. संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे तथा मुख्य निबंधक, जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठवावा. मा.संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा , पुणे तथा मा. मुख्य निबंधक, जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशाने सदर नोंद CRS पोर्टल वरुन रद्द करण्यात यावी. महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम ११ (६) नुसार निबंधकांनी जन्म अथवा मृत्यु ची कोणतीही नोंद मुख्य निबंधकांच्या मान्यते शिवाय रद्द करु नये.

९) जन्म मृत्यू नोंदणी अभिलेखाचे पुनर्निर्माण

केंद्र शासनाचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ३०(२)क अंतर्गत महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी नियम १७(१) व (४) मधील तरतुदीनुसार जन्म मृत्यु व उपजत मृत्यु चे सर्व अभिलेख हे कायम स्वरुपी जतन करुन ठेवणे ही निबंधकाची जबाबदारी आहे. निबंधकाने जन्म आणि मृत्यू नोंदणी नोंदवह्या आपल्या कार्यालयात जन्म नोंद वह्या ६ वर्ष व मृत्यु नोंदवह्या किमान एक वर्ष

ठेवाव्यात आणि त्यानंतर ते सुरक्षित ठिकाणी नियुक्त प्राधिकरणाकडे हस्तांतरित कराव्यात. तथापि सर्व निबंधकांनी अभिलेख कक्षात सुरक्षित ठेवण्यासाठी संबधित नियुक्त प्राधिकारी यांचे कडे हस्तातरीत करण्यापुर्वी नोंदणी करण्यात आलेल्या सर्वांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आल्याची खात्री करावी. जेणे करुन परत प्रमाणपत्र देण्याकरीता सुरक्षित ठिकाणाहुन नोंदवहयांची हाताळणी कमी करता येईल. जुन्या जन्म मृत्युच्या नोंदवहया वारंवार वापरल्यामुळे त्या जीर्ण होतात आणि वापरण्यास अयोग्य ठरतात. तसेच इतर नैसर्गिक आपत्तीजनक कारणांमुळे नोंदवह्या नष्ट झालेल्या किंवा खराब झालेल्या आहेत. अशा नोंदणीचे दाखले घेण्यासाठी नागरिक येत असतात तेव्हा त्यानां दाखले देण्यात अडचण निर्माण होते. याबाबत केंद्र शासनाच्या दिनांक २२.०८.२०१२ रोजीच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नोंदीच्या पुनर्बांधणीची प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी पुढील मुद्दे विचारात घ्यावेत. जर कोणत्याही कारणामुळे जन्म आणि मृत्यू नोंदणी अभिलेख (रेकॉर्ड्स) गहाळ, खराब किंवा नष्ट झाले असतील, तर संबंधित नोंदणी कार्यालयाचे निबंधक (ग्रामीण भागाकरीता), गटविकास अधिकारी किंवा कोणत्याही विहित प्राधिकरणाद्वारे, गहाळ/खराब/नष्ट झालेल्या अभिलेखांच्या पुनर्निर्माणाबाबत आवश्यक अधिसूचना/मान्यता जारी करण्यासाठी, सबळ कारणांसह जिल्हा निबंधकांकडे प्रस्ताव सादर करतील. शहरी भागांच्या बाबतीत, नगरपालिका आणि महानगरपालिकेचे निबंधक असा प्रस्ताव जिल्हा निबंधक यांच्याकडे सादर करतील. जन्म/मृत्यू नोंदणी अभिलेखांच्या पुनर्निर्माणाबाबतची अधिसूचना/मान्यता संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक छाननी केल्यानंतरच दिली जाईल. संबंधित निबंधक अभिलेखांच्या पुनर्निर्माणाची कार्यवाही केवळ अशी अधिसूचना/मान्यता प्राप्त झाल्यानंतरच करतील. अभिलेखांच्या पुनर्निर्माणासाठी पुढील कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. संबंधित व्यक्तीने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याच्या आधारे नोंदवहीची पुनर्रचना करण्यात येईल. निबंधक संबंधित नोंदणी केंद्राच्या क्षेत्रात सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करून, लोकांना जन्म/मृत्यू नोंदणीच्या घटनांचे पुरावे, उदा. जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्रे इत्यादी, विहित मुदतीत पाठविण्यास सांगू शकतात. संबंधित व्यक्तींनी अशा प्रकारे सादर केलेला पुरावा नोंदणी अधिकाऱ्यांकडून कायमस्वरूपी अभिलेख म्हणून जतन केला जाईल.

ज्या प्रकरणात संबंधित व्यक्तीकडे जन्म आणि मृत्यूचा लेखी पुरावा उपलब्ध नसेल, त्या प्रकरणात शासकीय कार्यालयातील, शालेय अभिलेख इत्यादींमधील जन्म किंवा मृत्यूच्या तारखेची नोंद करावी, आणि त्यासोबत हा उल्लेख असावा की ही नोंद जन्म/मृत्यू प्रमाणपत्राच्या आधारावर करण्यात आली आहे.

सदर पुनर्निर्मिती अभिलेख कालावधीतील जर जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्राची मागणी प्राप्त झाली आणि घटनेच्या नोंदणीचा कोणताही सबळ पुरावा आढळला नाही, तर असे गृहीत धरले जाईल की ती विशिष्ट घटना जन्म किंवा मृत्यूची नोंद संबंधित वर्षाच्या संबंधित नोंदवहीत झाली नव्हती. निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम कलम१३(३) नुसार व नियम १७(३) मधील कायदेशीर तरतुदीनुसार, संबंधित व्यक्तीला कलमांच्या विलंबित नोंदणीच्या कायदेशीर तरतुदी नुसार आणि विहित कार्यपद्धतीचे पालन करावे.

जन्म मृत्युच्या नोंदवह्या चोरी किंवा गहाळ होण्याच्या घटना टाळण्यासाठी, जन्म आणि मृत्यू नोंदणी निबंधकांनी जन्म आणि मृत्यू नोंदणीच्या नोंदी सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात. निबंधकांनी जन्म आणि मृत्यूच्या नोंदणीच्या नोंदींची तपासणी /हाताळणी त्याच्या उपस्थितच होईल याची खबरदारी /काळजी घ्यावी. एखाद्या विशिष्ट नोंदणी केंद्राच्या परिसरात नैसर्गिक आपत्तीची चेतावणी आल्यास किंवा नोंदणी कार्यालयात आग लागल्यास किंवा अपघात घडल्यास, निबंधकाने आपल्या अखत्यारीतील अभिलेख सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत आणि घटनेचा सविस्तर अहवाल तात्काळ संबंधित प्राधिकरणास पाठवावा. संबंधित प्राधिकरणाने जिल्हा निबंधकामार्फत मुख्य निबंधकांना तात्काळ कळवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

जेव्हा जन्म आणि मृत्यू नोंदवहीची पाने जीर्ण होऊन फाटू लागतात, तेव्हा संबंधित निबंधकांनी ती पाने तात्काळ त्यांच्या मूळ स्वरूपात पुनर्निर्मित करण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना कराव्यात. अभिलेखाच्या पुनर्रचनेची तारीख दर्शवून, संबंधित नोंदवहीच्या शेरांच्या रकान्यात अभिलेखाच्या पुनर्रचनेसंबंधी आवश्यक नोंद देखील करावी. नोंदीबाबतच्या संभाव्य दुरुस्तीची शक्यता कमी करण्यासाठी, हे सुनिश्चित केले जावे की, जर संबंधित व्यक्तीकडे कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसेल आणि कार्यालयीन नोंदी किंवा शाळेच्या नोंदींच्या आधारे नोंद केली जात असेल, तर

तपशील नोंदवण्यापूर्वी संबंधित व्यक्तीकडून असे हमीपत्र घेतले जावे की, संबंधित तपशील अचूक आणि अंतिम आहेत. जिल्हा किंवा तालुका स्तरावरील सक्षम अधिकाऱ्यांनी नोंदणी केंद्राला भेट देताना किंवा तपासणी करताना, जन्म आणि मृत्यू नोंदी योग्य रीतीने आणि सुरक्षितपणे ठेवल्या आहेत याची खात्री करावी. जर अभिलेख सुरक्षित आणि योग्य पद्धतीने ठेवलेला नाही असे आढळल्यास, तपासणी प्राधिकरणाने निबंधकाला योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश द्यावेत. त्यांच्या अहवालात या समस्या अधोरेखित केल्या पाहिजेत आणि त्याविषयी मुख्य निबंधक कार्यालयाला कळवण्यात यावे.

उपरोक्त सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन व जन्म मृत्यू कायद्याप्रमाणे जिल्हा निबंधक यांनी निबंधकांमार्फत जन्म, मृत्यू व उपजत मृत्यू नोंदणीची अंमलबजावणी करावी. नियमित संनियंत्रण व पर्यवेक्षण करून जन्म मृत्यू कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. विजय कंदेवाड)
संचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा, पुणे
तथा मुख्य निबंधक,जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य

प्रत कार्यवाहीसाठी:

१. उपसंचालक, आरोग्य सेवा,परिमंडळे .... (सर्व)
२. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय ....(सर्व)
३. वैद्यकीय आरोग्य अधिकारी (मनपा), महानगरपालिका... (सर्व)
४. कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक बृहन्मुंबई महानगरपालिका

२/- आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधितांना याबाबत कळविण्यात यावे.

प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव :

१. मा. जिल्हाधिकारी ....(सर्व)

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक ,वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,मुंबई
४. संचालक (रुग्णालये) आरोग्य सेवा, आयुक्तालय मुंबई